सिमेंट नाला बांध/चेकडॅम कार्यक्रम
राबविताना मूल्यमापनातील निष्कर्षानुसार:
दक्षता घेणे.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : जलसं-२०१२/प्र.क्र.५१/जल-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ सप्टेंबर,२०१२.

**परिपत्रक :**

विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा व वर्धा या सहा जिल्ह्यांसाठी सन २००६-०७ ते सन २००७-०८ या २ वर्षाच्या कालावधीमधील मा.पंतप्रधान पॅकेज अंतर्गत ६०६५ चेकडॅम बांधण्यात आले आहेत. कृषि आयुक्तालयातील संनियंत्रण व मूल्यमापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांनी सदर योजनेचा मूल्यमापन अहवाल तयार केला आहे. सदर अहवालामध्ये काही महत्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत.

२. राज्यातील टंचाई परिस्थितीवर मात करण्याच्या उद्देशाने राज्यात साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध (सिमेंट चेकडॅम) बांधण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यापुढे सिमेंट नाला बांध कार्यक्रम राबविताना खालील मुद्यांबाबत दक्षता घेण्यात यावी.

(१) बांधामध्ये गाळ साचू नये म्हणून शेताच्या कडेने मातीचे लहान बांध बांधण्यास संबंधित शेतकऱ्यांचे प्रबोधन करावे. जेणेकरुन शेतातील माती पाण्याबरोबर नाला प्रवाहात येणार नाही.

(२) चेकडॅममध्ये पाणीसाठा होण्याच्या दृष्टीने चेकडॅममध्ये साचलेला गाळ वेळोवेळी काढणे आवश्यक आहे, चेकडॅम हस्तांतरण झाल्यानंतर त्याची पुढील देखभाल व निगा राखण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे.

(३) शक्यतो चेकडॅमची कामे ही स्वतंत्र घेण्याऐवजी ती एकाच नाल्यावर साखळी पध्दतीने घ्यावी. जेणेकरुन, त्याचा एकत्रित परिणाम दिसून येईल आणि त्यात गाळ साचण्याचे प्रमाणही कमी राहील.

(४) चेकडॅमचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तांत्रिक मंजुरी रक्कम, एकूण झालेला खर्च, काम पूर्ण दिनांक आणि योजनेचे नांव असा मजकूर असलेला फलक चेकडॅमच्या दर्शनी भागावर /भिंतीवर लावणे अपेक्षित आहे. सदर फलकावर विभागाचे नांव ग्राम विकास व जलसंधारण विभाग असे स्पष्टपणे नमूद करावे.

(५) सिमेंट नालाबांधाचे काम पूर्ण झाल्यानंतर तो बांध ज्या खातेदाराच्या भू-मापन क्रमांकामध्ये बांधण्यात आला आहे, त्यांच्याकडे पुढील देखभाल व निगा राखण्यासाठी हस्तांतरीत करण्यात यावा. त्यावेळी संबंधित खातेदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात.

३. सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२०९११११५४०२८१२०२ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( ना. प्री. कराड )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री,(जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव यांचे सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
मुख्य अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व सहसचिव /उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (जलसंधारण विभाग), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती-जल-७ .